


# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८२ वा ❑ गुरूवार दि.०८ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### बिनविरोध लोकशाहीसाठी घातकच?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

महाराष्ट्रात सध्या महानगरपालिकेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. नगर परिषद/नगर पंचायती पेक्षाच नव्हे तर लोकसभा व विधानसभा निवडणुकांपेक्षा महानगरपालिकांच्या निवडणुका हा चर्चेचा व चुरशीचा व तितकाच वादग्रस्त विषय झाला आहे... कोणता पक्ष, कोणत्या पक्षाची सोबत युती, कोणता पक्ष कोणत्या पक्षासोबत आहे, हे मतदारांना समजे नासे झाले असून या बाबत मतदार संभ्रमात असतानाच आता महानगर पालिकांच्या निवडणुका बिनविरोध मुळे चर्चे च्या व तितक्याच वादग्रस्त झाल्या आहेत. भारताच्या निवडणूक इतिहासात आता पर्यंत कोणत्याही निवडणुका बिन विरोध उमेदवार इतक्या मोठ्या संख्येने निवडून आले नाही. मात्र यंदा महानगर पालिकेच्या निवडणुकीत सत्तारूढ पक्षाचे जवळपास ७० उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने विरोधकांनी यावर आक्षेप घेत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. साम, दाम दंड, दबाव या तंत्राचा अवलंब करून सत्तारूढ सरकारने बिनविरोध निवडून आणल्याचा घणाघात विरोधी पक्ष करत चौकशीची मागणी निवडणूक आयोगाकडे केली.

दरम्यान, निवडणूक आयोगाने बिनविरोध प्रकरणाची नि:पक्ष चौकशी करण्याची ग्वाही दिली आहे. जर साम दाम दंड या आयुधांचा वापर करून उमेदवारांना बिनविरोध निवडून आणले असेल तर हा लोकशाहीचा खून आहे. मतदारांचे मतदान करण्याचा हक्कच हिरावून घेणारा आहे. मतदानातून मत व्यक्त होत असते...जिथे मत व्यक्त करण्याचा अधिकार हिरावून घेतला जात असेल तर लोकशाहीच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण होतो. राजकीय पक्षांसाठी बिनविरोध हा शब्द जरी गोंडस वाटत असला तरी, मुलभूत हक्कांचं उल्लंघन आणि लोकशाहीवर आघात करण्याचं काम यंदाच्या निवडणुकांमधून होतंय असंच म्हणावं लागेल.

ही निवडणूक पक्षविरहित निवडणूक होऊ घातली आहे का? असाही प्रश्न आता उपस्थित होत आहे.विरोधारहित लोकशाही म्हणजे अशी लोकशाही व्यवस्था जिथे राजकीय पक्ष नसतात किंवा ते निवडणुकीत भाग घेत नाहीत, ज्यामुळे नेते पक्षाऐवजी व्यक्ती म्हणून निवडले जातात; भारतात जयप्रकाश नारायण यांनी अशा पक्षविरहित लोकशाहीची कल्पना मांडली होती, जिथे लोकांचे कल्याण हे पक्षांच्या राजकारणापेक्षा महत्त्वाचे मानले जाते, पण प्रत्यक्षात विरोधी पक्ष लोकशाहीला मजबूत करतात आणि सरकारवर नियंत्रण ठेवतात.

विरोधी पक्षांशिवाय लोकशाही कमकुवत होऊ शकते, कारण एकपक्षीय वर्चस्व वाढण्याचा धोका असतो. विरोधारहित लोकशाही ही एक आदर्श संकल्पना असली तरी, वास्तविक जगात प्रभावी विरोधी पक्ष हे लोकशाहीच्या कामकाजासाठी आवश्यक मानले जातात, कारण ते सत्तेचा गैरवापर थांबवतात आणि लोकांचा आवाज बनतात. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून मिरवणाऱ्या देशात अशा पद्धतीने मतदारांचा मतदानाचा हक्क हिरावून घेतला जात असेल तर लोकशाहीसाठी हा घातक पायंडा पडत आहे.

या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर उमेदवारी अर्ज दाखल करताना दबाव, धमकी किंवा प्रलोभनांचा वापर झाला का, याची सखोल चौकशी करण्याचा निर्णय आयोगाने घेतला असून संबंधित निवडणूक यंत्रणेकडून सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे.

एखाद्या प्रभागातील निवडणूक बिनविरोध पार पडल्यास राज्य निवडणूक आयोगाला सविस्तर अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा आणि आयोगाच्या मान्यतेनंतरच निकाल जाहीर करण्यात यावा, असा राज्य निवडणूक आयोगाचा स्पष्ट आदेश असल्याने महापालिका निवडणुकीत बिनविरोध निवड झालेल्यांची लगेचच निवड जाहीर करता येणार नाही. ज्या महापालिकेत बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत, त्यांच्या आयुक्तांकडूनही आयोगाने अहवाल मागविला आहे.

तत्कालीन राज्य निवडणूक आयुक्त नंदलाल यांनी २३ डिसेंबर २००४ मध्ये बिनविरोध निवडीबाबत एक आदेश जारी केला होता. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर एकच उमेदवार शिल्लक राहिल्यास त्याला विजयी घोषित केले जात असे. पण इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापुढे असे प्रकार घडल्यास राज्य निवडणूक आयोगाला सविस्तर अहवाल तात्काळ सादर करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यावरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यात यावे, अशी तरतूद करण्यात आली होती. यामुळेच निवडणूक बिनविरोध झालेल्या महानगरपालिकांच्या आयुक्तांना सविस्तर अहवाल निवडणूक आयोगाला सादर करावा लागणार आहे. निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतरच त्यांना विजयी घोषित करता येईल.

बिनविरोध हे सहमतीने होत असते.मात्र जेव्हा ही संख्या ६०/७० वर जाते तेव्हा संशयाची सुई सत्ताधाऱ्यांकडे वळते..या बाबत निवडणूक आयोगाने निःपक्ष चौकशी करावी, ही अपेक्षा आहे.पण प्रश्न हा आहे की एकदा नामनिर्देशन मागे घेतल्यानंतर पुन्हा अर्ज दाखल करण्याची तरतूद नाही.या चौकशी नंतर निवडणूक आयोग कोणता निर्णय घेणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

नोटा पर्याय असताना निवडणुका बिनविरोध करता येतात का?

निवडणूक आयोगाने या बिनविरोध पॅटर्नची दखल घेतलीय, असं म्हणतात. पण, आयोगाने आत्तापर्यंत केवळ दखल घेतल्याचेच वृत्त माध्यमांत झळकलंय. पुढे ही दखल बेदखलच झाल्याचं दिसून आलं. एक विशेष म्हणजे, कित्येक आंदोलनानंतर मतदान यंत्रावर हा पर्याय उपलब्ध झाला आहे. म्हणजे, मतदारांना वरीलपैकी एकाही उमेदवारास पंसती नसल्याचे सांगण्याचा मतदानातून अधिकार आहे. मग, जर मतदारांना नोटा बटण दाबून मत देण्याचा अधिकार आहे तर निवडणुका बिनविरोध करता येतात का? ती निवडणूक बिनविरोध म्हणता येईल का? असा कायदेशीर प्रश्न मुंबई उच्च न्यायालयातील वकील ॲड. जीवनदत्त आरगडे यांनी उपस्थित केला आहे. निवडणूक आयोगाने त्यावरही कायदेशीर स्पष्टीकरण देणं गरजेचं आहे. अन्यथा, निवडणुकांचा बिनविरोध पॅटर्न भविष्यात निवडणूक प्रक्रियेची भरदिवसा हत्या करुन जाईल, आणि सर्वजण डोळे झाकून बसतील.

# डॉक्टरांच्या हितासाठी शासनाशी सविस्तर संवाद

## आयएमए शिष्टमंडळाने महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोर मांडल्या डॉक्टरांच्या अडचणी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्याच्या वतीने सहसचिव डॉ. अनुपम टाकळकर यांनी मा. महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन राज्यातील क्लिनिक, डे-केअर सेंटर तसेच छोटे व मध्यम रुग्णालयांना भेडसावणाऱ्या गंभीर नियामक व प्रशासकीय अडचणींबाबत सविस्तर चर्चा केली. या भेटीत आयएमए तर्फे तयार करण्यात आलेले अधिकृत निवेदन मंत्री महोदयांना सुपूर्द करण्यात आले.



या चर्चेत प्रामुख्याने ५० बेडपेक्षा कमी क्षमतेच्या रुग्णालयांवरील नोंदणी, बँक गॅरंटी व दंडाचा अनावश्यक ताण हा मुद्दा ठामपणे मांडण्यात आला. अशा रुग्णालयांकडून अत्यल्प जैववैद्यकीय कचरा निर्माण होत असून तो आधीच अधिकृत बायोमेडिकल संस्थांमार्फत वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापित केला जातो. त्यामुळे या आरोग्य संस्थांना औद्योगिक घटकांप्रमाणे वागणूक देणे अव्यवहार्य व अन्यायकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. ५० बेडखालील संस्थांना सवलत देणे व ५० ते २०० बेड क्षमतेच्या रुग्णालयांसाठी प्रमाणानुसार नियम लागू करण्याची मागणी करण्यात आली.

यासोबतच अनेक विभागांकडून होणाऱ्या ओव्हरलॅप तपासण्या, विविध नोंदण्या व परवानग्यांमुळे निर्माण होणारा प्रशासकीय ताण, तसेच सिंगल विंडो डिजिटल प्रणालीची आवश्यकता याबाबतही सविस्तर चर्चा झाली. धोरण ठरवताना इंडियन मेडिकल असोसिएशनशी सातत्यपूर्ण संवाद ठेवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

यादरम्यान डॉ अनुपम टाकळकर यांनी कायदा व (फॉर्म ) अंमलबजावणीतील व्यावहारिक अडचणी, किरकोळ प्रक्रियात्मक त्रुटींमुळे होणारी दंडात्मक कारवाई, तसेच स्पष्ट मार्गदर्शक सूचना व डिजिटल प्रणालीची आवश्यकता याबाबत मंत्रिमहोदयांसमोर आयएमए ची बाजू मांडली. याशिवाय नर्सिंग स्टाफची कमतरता, प्रतिगामी नियमांची अंमलबजावणी टाळणे, डे-केअर सेंटरसाठी स्वतंत्र व सुलभ नियम, पॅकेज दरांचे पुनर्मूल्यांकन आणि डॉक्टर संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी हे मुद्देही मांडण्यात आले.

माननीय मंत्री महोदयांनी सर्व मुद्दे शांतपणे ऐकून घेतले व मांडलेल्या अडचणींची दखल घेतली. हे विषय धोरणात्मक पातळीवर तपासले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

या भेटीत डॉ. योगेश लक्कास आणि डॉ. दत्तात्रय कदम यांचे सक्रिय सहकार्य लाभले. तसेच या संपूर्ण प्रक्रियेत आयएमए महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी आणि सचिव डॉ विक्रांत देसाई यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य डॉक्टरांच्या प्रॅक्टिसचे संरक्षण, न्याय्य नियम आणि रुग्णसेवा सुलभ करण्यासाठी शासनाशी सातत्याने संवाद साधत राहील, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा'चे आयोजन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




**मुंबई** – १२ जानेवारी च्या राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ''संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५ -२६'' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन स्वरूपात १५ दिवसांचे प्रशिक्षण राबविण्यात येणार असून, या प्रशिक्षणात संविधानासंबंधी सखोल माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १० जानेवारी २०२६ पर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी केले आहे.

हा राज्यस्तरीय उपक्रम महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग यांच्या वतीने राबविण्यात येत असून, भारतीय संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव युवकांमध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. युवकांनी संविधान समजून घेऊन जबाबदार, सजग आणि लोकशाही मूल्यांवर आधारित नागरिक म्हणून घडावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ''घर घर संविधान'' या संकल्पनेतून ही जनजागृती चळवळ राज्यातील प्रत्येक घरापर्यंत व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

ही प्रश्नमंजुषा राज्यातील इयत्ता ८ वी ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खुली असून, संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. १२ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून ऑनलाईन प्रशिक्षणास प्रारंभ होईल.

प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार असून आवश्यक अध्ययन साहित्य ऑनलाईन उपलब्ध करून दिले जाणार आहे. ही स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (प्रॉक्टरिंगसह) परीक्षा घेण्यात येईल. सहभागासाठी केवळ ९९ रुपये इतके नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून प्रथम पुरस्कार १ लाख रुपये, द्वितीय पुरस्कार ५१ हजार रुपये, तृतीय पुरस्कार ११ हजार रुपये यासोबतच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिकांसह प्रमाणपत्रे देण्यात येणार असून, सहभागी सर्व विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

हा उपक्रम आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी), पुणे तसेच युवा करिअर क्लब यांच्या संयुक्त सहकार्याने राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाची संपूर्ण माहिती, नोंदणी प्रक्रिया व अधिकृत सूचना www.yuvacareer.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून, नागरिकांनी कोणत्याही अनधिकृत किंवा बनावट संकेतस्थळाला बळी न पडता केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच नोंदणी करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.









## जात्यावरच्या ओव्या......


हरपुन देहभान
निघालो पंढरपूरला
वाट सरत चालली
नाही फिकर जीवाला ||४३८||

तुझा माझ्यात नाही
मधोमधी आता कोन्ही
माथा पायावर ठेवून
हात जोडतो दोन्ही ||४३९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## ज्ञानतपस्वी आबासाहेब अमृतकार

ज्योतिर्मय साहित्य




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

कधी कधी बोलताना आबासाहेब त्यांच्या सुरुवातीच्या दिवसाबद्दल सांगत अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले सुखदुःखाचे अनेक आघात त्यांना काळाच्या ओघात झेलावे लागले. सुरुवातीला उत्तम असणारी दृष्टी नंतर अधू झाली. त्यांनी त्यासाठी अनेक उपाय केले परंतु काही उपयोग झाला नाही. परंतु आपली जिद्द आणि इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी या अधू-दृष्टीच्या व्यंगावरही मात करून आपल्या विद्यार्थ्यांना डोळसपणे घडवले हे त्यांचे मोठेपण आहे. प्रतिकूल परिस्थिती आणि संकटे यामुळे ते कधी खचून गेले नाहीत किंवा हताश झाले नाहीत. आपले आनंदी मनोवृत्ती आणि सकारात्मक दृष्टिकोन त्यांनी कायमच जागृत ठेवला. त्याची पेरणी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये केली. आबासाहेबांचे अनेक विद्यार्थी आज देशात आणि परदेशात मोठ मोठ्या पदांवर उत्तम प्रकारे कार्यरत आहेत.



पडद्यावरील हिरो आणि रियल लाईफ हिरो यात फार मोठा फरक आहे. पडद्यावरील नायक फक्त ती भूमिका जगत असतो. परंतु वास्तव जीवनातील हा नायक अनेक अडीअडचणींना तोंड देऊन समाजाला प्रगतीपथावर नेत असतो. अमृतकार सर हे असे रियल लाईफ हिरो आहेत. करोडो रुपयांची संपत्ती असणारा एखादा कारखानदार किंवा नेता समाज मान्यता पावत असेल किंवा प्रतिष्ठा मिळवत असेल परंतु ज्यांचे पाय आवर्जून धरावे असे पाय आज मात्र अभावाने दिसतात. असे पावन पवित्र असे चरण सरांचे आहेत की ज्यांना हजारो विद्यार्थी आदराने वंदन करतात. आजही बाहेरगावचे किंवा परदेशातील विद्यार्थी चाळीसगावी आले की सरांची आवर्जून भेट घेतात. त्यांचे आशीर्वाद घेतात.


काही कारणामुळे आबासाहेब शाळेचे मुख्याध्यापक जरी होऊ शकले नाहीत तरी ती उणीव त्यांनी आपल्या कर्तृत्वाने भरून काढली आणि आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला. त्यांच्या प्रति समाजामध्ये प्रचंड आदर होता संस्थेची ज्यावेळी निवडणूक झाली, त्यावेळी सभासदांनी भरभरून मते देऊन त्यांना संचालक म्हणून निवडून दिले. हीच त्यांच्या कामाची पावती होती. ते चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीचे संचालक झाले आणि या संचालक पदावर काम करत असताना देखील विद्यार्थी, शिक्षक पालक आणि संस्थेचे अन्य संचालक यांना आजही वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे ते मार्गदर्शन करीत असतात. वयाच्या ८५ व्या वर्षी देखील ते कार्यरत आहेत. आपल्या कार्यपूर्तीचे समाधान त्यांच्याजवळ नक्कीच असेल. अशा या ज्ञानतपस्वी असलेल्या गुरुवर्य आबासाहेब अमृतकार सरांना परमेश्वर उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना !

***




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏

## परमेश्वराची खरी पूजा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज


ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ‘ मी साधन करतो ’ असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ‘ रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ’ सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ‘ रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ’ असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

‘ माझ्या देवाला हे आवडेल का ? ’ अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.



दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६



## ब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

हे करत असताना देहाला भलतेच महत्त्व प्राप्त झालेले असते. देहाच्या पलीकडे जाऊन जीवाचे कल्याण करावे यासाठी संत जवळ करावे लागतात. देहबुद्धी विलक्षण क्षीण असते ती योगी महायोगी हटयोगी यांनाही त्रास देते. देहबुद्धी नको कारण परमार्थ साधनेत देहबुध्दीतील हेवेदावे अहंभाव हा अडसर बनतो. खरतर मूलतः जीव ब्रम्हस्वरूप असून सुध्दा केवळ अहंकाराने त्याला सद्वस्तूमध्ये मिसळता येत नाही.

समर्थ सांगतात की,परमात्मवस्तु अगदी एकच आहे परंतू तिच्या अनुभवामध्ये दोन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ब्रम्ह अनंत आहे अनंत गुण, अनंत शक्ति त्याच्या ठायी वास करतात. प्रत्येक माणसाची मनोरचना भिन्न असल्याने ब्रम्हाचा अनुभव प्रत्येकाला वेगवेगळा येतो. कोणाला अनंत वाटतो, कोणाला अलिप्त वाटतो,निवांत वाटतो, कोणाला सर्वज्ञ वाटतो,कोणाला तो सत्ताधीश वाटतो. ज्या ज्या पातळीवर त्याला ब्रम्ह भेटतो त्या त्या पातळीवर तो त्याचे वर्णन करतो.ब्रम्ह नादरूप, ज्योतीरूप,साक्षिरूप, चैतन्यरूप आहे असे सांगतात.

जसे चंद्रसुर्य एकच आहेत कवींना ते काव्यमय वाटतात शास्त्रज्ञांना ते खगोलीय स्थिती आहे असे वाटते. तसे ब्रम्ह एकचं आहे माणसाची मनोरचना वेगवेगळी आहे त्यामुळे त्याला वेगवेगळे ब्रम्हतत्व दिसते. वास्तविक ब्रम्ह नामरूपाच्या पलीकडे आहे. ते निर्मल,निश्चल, अत्यंत शांत स्वतः च्या आनंदात रममाण असते.

ब्रम्हनादरूप, ज्योतीरुप, चैतन्यरूप, सत्तरूप, साक्षीरूप, स्वस्वरूप आहे. ते शुन्य सनातन

सर्वेश, सर्वज्ञ, सर्वात्मा व जगाचे जीवन आहे. तो सदोदीत, सहज, शुध्दबुध्दीचे, सर्वातीत, शाश्वत व सत्य आहे. ते विशाल आहे विस्तीर्ण आहे. विश्वात्मक आहे. आकाश जसे मलरहित आहे तसे ब्रम्ह एकदम स्वच्छ आहे. ते आत्मा,परमात्मा, परमेश्वर आहे. ते परमात्मा असल्याने विशाल व विस्तीर्ण आहे. एकरूप व फार पुरातन आहे. ते चिद्रुप व चिनमात्र आहे. ज्या ब्रम्हाला नावे ठेवता येत नाहीत. परमेश्वर नावाच्या पलिकडे आहे. विश्वाचा विश्वास आहे. आदिपुरूष आत्माराम आहे. चौदा ब्रम्हाची लक्षणे शास्त्राच्या आधाराने करूया.

श्री राम जय राम जय जय राम।
जय जय रघुवीर समर्थ।
ब्रम्हनिरूपण समास दुसरा समाप्त



## श्री संत ज्ञानेश्वर
### अभंग व अर्थ

अभंग ३
मन मुरडोनि डोळां लेइलें ।
काळेपणें मिरवलें रुप त्याचें ।।१।।
बरवें रुप काळें अमोलिक ।
म्हणोनियां सांगतसे शुध्द भावें ।।ध्रु०।।
रखुमादेविवरु अगाध काळें ।
म्हणोनि सर्वत्र अर्पियलें ।।२।।

अर्थ:-
त्याचे काळेपण मिरवत असलेले रुप मी पाहिले तेंव्हा मन मारुन मी डोळ्यात साठवले. तेच काळेपण अनमोल असुन तेच मी शुध्द भावाने वर्णित आहे. ज्याने सर्व आकाश व्यापले तो रखुमाईचा पती अगाध (ठाईचा) काळा आहे असे माऊली सांगतात

अभंग ४
हरपली सत्ता मुराली वासना ।
सांवळाचि नयना दिसतसे ।।१।।
काय करूं माय सांवळा श्रीकृष्ण ।
सांगितला प्रश्न निवृत्तीनें ।।ध्रु०।।
बापरखुमादेविवरु सांवळीये तेज ।
सेजबाज निज कृष्ण सुखें ।।२।।

अर्थ:-
त्या सावळ्या मूर्तीला पाहिले व माझी वासना मुरोन गेली व माझी माझ्यावरची सत्ता लोप पावली. निवृत्तिनाथांनी त्याच्या बद्दल सांगितल्या पासुन मला काय झाले ते कळत नाही त्यांने मला व्यापुन टाकले आहे. माझे पिता व रखुमाईचा पती असलेल्या त्या सावळ्यारुपाने मला येवढे मोहित केले आहे की सेजे बाजे वर पहुडलो तरी तोच जाणवत राहतो असे माऊली सांगतात




## अँटिबायोटिक्सचा अतिवापर आणि रोगप्रतिकारशक्ती

ज्योतिर्मय साहित्य

घसा दुखला, सर्दी-खोकला झाला, ताप आला, की अनेक जण लगेच अँटिबायोटिक घेतात. काही वेळा डॉक्टरांकडून, तर कधी स्वतःहून. काही दिवसांनी बरं वाटतं; पण नंतर पुन्हा आजार डोकं वर काढतो. फंक्शनल मेडिसिनच्या दृष्टीने हा केवळ योगायोग नाही. वारंवार अँटिबायोटिक्स घेणं म्हणजे शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीवर थेट हल्ला करणं होय.

अँटिबायोटिक्स नेमकं काय करतात?

अँटिबायोटिक्स वाईट जंतूंना मारण्यासाठी वापरली जातात; पण ती फक्त ‘वाईट’ जंतूच मारत नाहीत, तर आपल्या शरीरातील चांगले जंतूसुद्धा (गुड बॅक्टेरिया) नष्ट करतात. विशेषतः आतड्यांतील मायक्रोबायोम यामुळे मोठ्या प्रमाणात बिघडतो.

आज आपण जाणतो, की सुमारे ७० टक्के रोगप्रतिकारशक्ती आतड्यांमध्ये असते. म्हणजे आतड्यांतील चांगले जंतू नष्ट झाले, तर रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होणं स्वाभाविक आहे.

आतड्यांचं नुकसान आणि ‘लीकी गट’

वारंवार अँटिबायोटिक्स घेतल्यामुळे आतड्यांची संरक्षक भिंत कमकुवत होते. याला ‘लीकी गट’ असं म्हटलं जातं. यामुळे अर्धवट पचलेलं अन्न, विषारी घटक रक्तात जातात आणि शरीर सतत सूज अवस्थेत राहतं. याचा परिणाम म्हणून वारंवार सर्दी-खोकला, ॲलर्जी, त्वचेचे आजार, थकवा, पचनाच्या तक्रारी इत्यादी समस्या वाढू लागतात.

व्हायरल आजारात अँटिबायोटिक्स – मोठी चूक

सर्दी, फ्लू, घसा खवखवणे यांपैकी बहुतांश आजार व्हायरसमुळे होतात. अँटिबायोटिक्सचा व्हायरसवर काहीही परिणाम होत नाही. उलट, ती रोगप्रतिकारशक्ती अजून कमकुवत करतात. फंक्शनल मेडिसिनमध्ये आजार बरा करणं इतकंच महत्त्वाचं नसून, पुढचा आजार टाळणं जास्त महत्त्वाचं मानलं जातं.

अँटिबायोटिक रेझिस्टन्स – भविष्यातला धोका

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

वारंवार अँटिबायोटिक्स घेतल्यामुळे जंतू त्यांना दाद देईनासे होतात. यालाच म्हणतात. उद्या एखादा गंभीर संसर्ग झाला, तर नेहमीची औषधं काम करणार नाहीत, हा मोठा धोका आहे.

फंक्शनल मेडिसिन काय वेगळं सुचवतं?

फंक्शनल मेडिसिन ही प्रिवेंटिव केअरवर आधारित आहे. इथे अँटिबायोटिक्स पूर्णपणे नाकारले जात नाही; पण गरज असेल तेव्हाच वापरण्याचा आग्रह धरते.

तसेच फंक्शनल मेडिसिन हे –

आतड्यांचं आरोग्य सुधारण्याकडे लक्ष देतं.

प्रोबायोटिक अन्न (दही, ताक, आंबवलेले पदार्थ) घेण्यावर भर देतं.

झोप पुरेशी असणं व ताण नियंत्रणात असणं यावर लक्ष देतं.

पोषणद्रव्यांची पूर्तता होण्याकडे भर देतं.

शरीराची अंतर्गत ताकद वाढते, तेव्हा आजार आपोआप कमी होतात.

निष्कर्ष

अँटिबायोटिक्स तात्पुरती आराम देऊ शकतात; पण त्यांचा अतिरेक शरीराची नैसर्गिक संरक्षणव्यवस्था कमकुवत करतो. आज गरज आहे ती पटकन औषध घेण्याची नाही, तर शरीर बळकट करण्याची. खरी रोगप्रतिकारशक्ती गोळ्यांत नसते, ती आपल्या आतड्यांत आणि जीवनशैलीत असते.

****



## लघु बोधकथा

♦ राजा आणि संत ♦

एका वनात दोन संत राहत होते. एकांतात आपल्या तपश्चर्येत लीन राहत होते. कधीतरी यात्रेकरूंचा जत्था जायचा तेव्हा ते संत त्यांच्याशी बोलत असत. त्याच यात्रेकरूकडून त्यांना तेथील राजास त्या संतांबाबत माहिती मिळाली. तो या दोघांना भेटण्यास निघाला. जेव्हा संतांना ही गोष्ट कळाली.तेव्हा त्या दोघांना वाटले की आता राजा येणार व त्याने आपला चांगूलपणा पाहिला तर तो आपणास सतत भेटण्यास येईल, त्याच्याबरोबर अनेक माणसे येतील, त्यां माणसांच्या संगतीने अजून काही माणसे येतील व अशाने या वनातील शांती भंग पावेल व एकांत मिळणार नाही व एकांत नसल्याने आपणास ध्यानसाधना करता येणार नाही. राजा आम्हाला दोघांना सामान्य माणूस समजेल असे काहीतरी केले पाहिजे. राजाचा लवाजमा तेथे पोहोचला तेव्हा राजाने पाहिले की ते दोघेही संत हातात लाठ्याकाठ्या घेऊन एकमेकांशी भांडत होते. पहिल्या संताने दुस-याला म्हटले," तू स्वत:ला कोण समजतोस, मी इतके ज्ञान मिळविले आहे की ते तू सात जन्मातही मिळवू शकणार नाही." दुसरा संत त्यावर म्हणाला," अरे तू तर पक्का खोटारडा आहेस, तुझ्या ज्ञानाच्या गप्पा मारून तू लहान मुलाला फसवू शकशील पण मला नाहीस. तुझ्यापेक्षा जास्त ज्ञान मी माझ्या शिष्यांना दिले आहे." राजाने व त्याच्याबरोबरच्या लोकांनी हे भांडण पाहिले व विचार करू लागले हे साधू संत तर सामान्य माणसाप्रमाणेच भांडत आहेत व त्यांनी सर्वांनी असल्या साधूसंतांचा संग नको म्हणून वनातून जाणेच पसंत केले. राजा व लोक जाताच दोन्ही संतांनी एकमेकांकडे पाहून मंदस्मित केले व गळाभेट घेतली. दोन्हीही साधू आपल्या साधनेत रममाण झाले.

तात्पर्य : चांगली गोष्ट घडवून आणण्यासाठी कधीकधी चुकीच्या मार्गाचाही अवलंब करावा लागतो.

# पत्रकार हे लोकशाहीचे पहिले रक्षक आणि समाजाचे सोशल डॉक्टर - डॉ ओमप्रकाश शेटे

## माजलगावात पत्रकार बांधवांशी हृद्य संवाद





**ज्योतिर्मय साहित्य**

**माजलगाव –** येथे माजलगाव पत्रकार संघ आयोजित दर्पण दिन सोहळ्याला उपस्थित राहून लोकशाहीच्या खऱ्या पहारेकऱ्यांशी संवाद साधताना आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्रचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे बोलत होते. ६ जानेवारी १८३२ रोजी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी जेव्हा दर्पण सुरू केले. तेंव्हा त्यांचा उद्देश केवळ माहिती देणे नव्हता तर समाजाला जागृत करणे हा होता. आजच्या फेक न्यूजच्या वादळात सत्य टिकवून ठेवणाऱ्या माजलगावच्या पत्रकारांचे मनःपूर्वक कौतुक केले.

या सोहळ्यात समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने:

१) मा. श्री. सुधाकर देशमुख (ज्येष्ठ पत्रकार) – दर्पण पुरस्कार २०२६
२) मा. श्री. बाजीरावभाऊ जगताप (माजी आमदार) – माजलगाव भूषण पुरस्कार
३) मा. सौ. मंगलताई प्र. सोळंके (अध्यक्ष, माजलगाव विकास प्रतिष्ठान) – समाज भूषण पुरस्कार
४) मा. महरीन शिफा बिलाल चाऊस (नूतन नगराध्यक्षा) – सत्कारमूर्ती
५) मा. श्री. शेख अब्दुल सत्तार (यशस्वी उद्योजक) – यशस्वी उद्योग भूषण पुरस्कार

पत्रकार बांधवांशी अतिशय मनमोकळा संवाद झाला. पत्रकार हा समाजाचा सोशल डॉक्टर असून तो व्यवस्थेतील त्रुटी शोधून त्यावर प्रशासनाला उपचार करायला भाग पाडतो. ग्रामीण भागात पत्रकारिता करणे हे धगधगत्या निखाऱ्यावर चालण्यासारखे आहे, तरीही सत्य लिहिण्याचे धाडस तुम्ही करता हीच खरी बाळशास्त्री जांभेकरांची शिकवण आहे. पत्रकार बांधवांच्या हक्काच्या निवासाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी माजलगाव नगरपरिषदेने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना त्यांनी केली. त्याठिकाणी पत्रकारांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण सोसायटी तयार करून देण्याचा शब्द मी या व्यासपीठावरून दिला आहे असे त्यांनी सांगितले.

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्रच्या' माध्यमातून मला निरोगी महाराष्ट्र घडवायचा आहे आणि त्यासाठी मला तुमच्या (पत्रकार बांधवांच्या) पारदर्शक पत्रकारितेची व सहकार्याची गरज आहे. माझी योजना जर शरीर असेल, तर तुमची सकारात्मक पत्रकारिता त्या योजनेचा आत्मा आहे. तुमची लेखणी जेव्हा सत्यासाठी चालते तेव्हा ती शस्त्रापेक्षा कमी नसते आणि जेव्हा ती गरिबांच्या मदतीसाठी चालते तेव्हा ती एखाद्या प्रार्थनास्थळापेक्षा पवित्र असते. माजलगाव पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकारी आणि पत्रकार बांधवांचे या स्नेहपूर्ण व सुंदर आयोजनाबद्दल त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.




# अ.भा.म.सा. संमेलनात चुडाराम बल्हारपुरे सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

गडचिरोली – नुकत्याच सातारा येथे झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कवी संमेलनाचे प्रथम सत्रात झाडीपट्टीतील नाटककार व कवी चुडाराम बल्हारपुरे यांना निमंत्रित कवी म्हणून पाचारण करण्यात आले होते. संमेलनातील मुख्य मंडपात उद्घाटन कार्यक्रमानंतर प्रसिद्ध साहित्यिक व कवी अशोक नायगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कवी संमेलनात चुडाराम बल्हारपुरे यांनी ‘‘रानगर्भातील रानफुले‘‘ या गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कवितेचे सादरीकरण केले. उपस्थित कवी, साहित्यिक व रसिक प्रेक्षकांनी त्यांच्या कवितेला उत्स्फूर्त दाद दिली. कवी संमेलनाचे संचलन प्रसिद्ध कवी प्रा. प्रदिप कांबळे यांनी केले. या कवी संमेलनात विदर्भातील दोन कवींसह




संपूर्ण देशातून ३३ प्रसिद्ध कवी उपस्थित होते. अ.भा.सा.महामंडळाचे अध्यक्ष प्रा.मिलींद जोशी यांचे हस्ते तसेच गुरय्या स्वामी (उपाध्यक्ष), विनोद कुलकर्णी (कोषाध्यक्ष), सुनिता राजे पवार (कार्यवाह), नंदकुमार सावंत (अध्यक्ष म.सा.प. पुणे), अनिल जठार (सदस्य मावळा फाऊंडेशन) व कवी संमेलनाचे अध्यक्ष अशोक नायगावकर इ.मान्यवर यांचे उपस्थितीत चुडाराम बल्हारपुरे यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

चुडाराम बल्हारपुरे यांच्या या यशाबद्दल प्रा. अरुण बुरे, योगेश गोहणे, प्रा. यादव गहाण, प्रा.डॉ.श्याम मोहरकर, प्रा.डॉ. जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. योगीराज नगराळे, प्रा. राजेंद्र गोहणे, नाट्यश्रीचे दादा चुधरी, दिलीप मेश्राम, राजेंद्र जरुरकर, डॉ. दिपक चौधरी, रमेश निखारे, तसेच प्रा. नवनीत देशमुख, राजीव पुजारी, नरेंद्र कदम, मुग्धा बोरकर, सुनील बावणे, प्रदिप देशमुख इ. साहित्यिक तसेच मधुश्री प्रकाशनचे पराग लोणकर (प्रकाशक) व इतर साहित्यिक व कलावंतांनी अभिनंदन केले आहे.




# विद्या भारती हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयात सावित्रीमाई फुले जयंती साजरी



**ज्योतिर्मय साहित्य**

कुरखेडा : दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा विद्या भारती हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय पुराडा येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या उत्सवाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थीनी कु.पिंगला मुंगणकर ऊर्फ संगीता ठलाल साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या कुरखेडा प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. माजी विद्यार्थीनी पिंगला मुंगणकर यांनी विध्यार्थांना प्रेरणादायी असे मोलाचे मार्गदर्शन केले व शाळेला भेट म्हणून आपली स्वलिखित ‘‘रानभाज्यांच्या जगात‘‘ ही पुस्तक दिली. शाळेच्या वतीने तसेच माजी प्राचार्य सि.एल. डोंगरवार, प्राचार्य पिलावन, जेष्ठ शिक्षक यादव बानबले यांच्या हस्ते पिंगला मुंगणकर यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रा.गोरटकर, ठाकरे, गंगबोईर, सचिन तोफा, रंधये, किरण डोंगरवार, उर्मिला डोंगरवार, नाकाडे, मडावी व कर्मचारी आणि विद्यार्थी, विद्यार्थीनी प्रामुख्याने उपस्थित होते.









# रुक्ष वाळवंटात पर्यटन व्यवसायाने झालेला कायापालट (लेखांक-२)

**ज्योतिर्मय साहित्य**

निष्पर्ण वाळवंट सदाहरित कसे करावे, याचा प्रेरणादायी आदर्श दुबईने जगासमोर ठेवला आहे. समुद्रकिनारी पक्ष्याचे संरक्षण आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळवण्यासाठी मँग्रोव्हसारख्या वृक्षांचे संवर्धन करण्यात आले आहे. पर्जन्यमान अत्यल्प असल्याने सांडपाण्यावर प्रक्रिया करून ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून गफ ट्री, खजूर व सिद्र ट्री यांची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे.

वृक्षतोडीवर प्रभावी व जाचक दंडात्मक कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली जाते. नागरी वाहतुकीचे नियम अत्यंत शिस्तबद्धपणे पाळले जातात. झेब्रा क्रॉसिंगवर पादचाऱ्यांना प्राधान्य दिले जाते तसेच हॉर्नच्या वापरावर नियंत्रण ठेवून ध्वनी प्रदूषण टाळले जाते. चालकविरहित मेट्रो हे दुबईचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. गुन्हेगारीचे प्रमाण जवळपास शून्य असल्यामुळे दुबई हे जागतिक स्तरावर सुरक्षित शहर मानले जाते. येथे काम करणाऱ्या नागरिकांवर कोणताही प्राप्तिकर आकारला जात नाही. अरबी ही अधिकृत भाषा असून बहुसंख्य लोकसंख्या मुस्लिम असली तरी इतर धर्मीयांचा सन्मान केला जातो. रोजगारासाठी दुबईत आलेल्या भारतीयांची संख्या सर्वाधिक आहे.

प्रेक्षणीय स्थळे

दुबई हे शहर निरिक्षणासाठी अत्यंत लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. २५० मीटर (८२० फूट) उंचीचे हे जगातील सर्वात उंच ऑब्झर्वेशन व्हील असून ते ब्लू वॉटर आयलंड या मानवनिर्मित बेटावर उभारले आहे. पारदर्शक फायबरचे ४८ भव्य केबिन्स असलेल्या या व्हीलमध्ये १५०० पेक्षा अधिक प्रवाशांची क्षमता आहे. येथून दुबई मरीना, पाम जुमेराह, बुर्ज अल अरब आणि बुर्ज खलिफा यांचे विहंगम दर्शन घडते.







डेरा सिटी मॉल, दुबई सिटी फ्रेम, हमरीया बोट, पाम आयलंड, जबेल पॅलेस आणि क्रूझ डिनर या इतर प्रेक्षणीय स्थळांनाही भेट देण्यात आली.

बुर्ज खलिफा : संयुक्त अरब अमिरातीतील दुबईचे सर्वात प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणजे बुर्ज खलिफा. जगातील सर्वात उंच इमारत म्हणून ती ओळखली जाते. ४ जानेवारी २००४ रोजी सुरू झालेले बांधकाम ६ वर्षांत पूर्ण होऊन ४ जानेवारी २०१० रोजी उद्घाटन झाले. सुमारे ८२८ मीटर (२७१७ फूट) उंचीची आणि १६३ मजली ही इमारत ९०९२ कि.मी. अंतरावरूनही दिसते. यात ९०० अपार्टमेंट्स, ३०४ हॉटेल रूम्स आणि सुमारे २९५० वाहनांसाठी पार्किंग सुविधा आहे. 'एमार प्रॉपर्टीज' या कंपनीने ही वास्तू विकसित केली असून प्रसिद्ध वास्तुविशारद ॲड्रियन स्मिथ यांनी तिचे रेखाटन केले आहे. अबूधाबीचे शासक शेख खलिफा यांच्या

भटकंती
TAKE A BREAK
डॉ श्याम कुलकर्णी,
पुणे मो. 98238 09656

नावावरून या इमारतीला ''बुर्ज खलिफा'' असे नाव देण्यात आले.

बुर्ज खलिफासमोर संगीतातील तालावर नाचणारे कारंजे हे आणखी एक प्रमुख आकर्षण आहे.

मिरॅकल गार्डन : हे दुबई पर्यटनातील अत्यंत आकर्षक ठिकाण आहे. रुक्ष वाळवंटात फुलवलेली ही बाग शासनाच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. कोट्यवधी रंगीबेरंगी फुलांपासून हत्ती, घोडे, मोर, विमान, घड्याळे व वास्तूंच्या भव्य आकृती साकारण्यात आल्या आहेत. सांडपाण्यावर प्रक्रिया करून आधुनिक सिंचन पद्धतीने ही बाग फुलवण्यात आली आहे.

ग्लोबल व्हिलेज : हे दुबईपासून सुमारे १०० कि.मी. अंतरावर विकसित करण्यात आलेले आंतरराष्ट्रीय व्यापार व संस्कृती केंद्र आहे. येथे भारतासह तुर्की, चीन, थायलंड, इराण आणि युरोपियन देशांच्या वस्तू, खाद्य पदार्थ व हस्तकलेचे दर्शन व खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी पाहायला मिळते.

# दाता

**ज्योतिर्मय साहित्य**

आज सहजच स्व.विंदा सरांची एक कविता पुन्हा  वाचण्यात आली.

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता घेणाऱ्याने
देणाऱ्याचे हात घ्यावे

किती सुंदर आणि अर्थपुर्ण ओळी आहेत या. शेवटच्या ओळीत देणाऱ्याचे हात घ्यावे. अतिशय आशयपुर्ण शब्द. खुप काही सांगणारा.

खरच जीवन जगताना जगण्याचा आनंद दाता होऊन कसा घेता येईल ? याचा विचार आपण करू यात दाता म्हणजे देणारा, दानकर्ता. आपण कर्णा एवढे दानशूर होणे अशक्य असेल,पण मनात आणले तर आपण छोटे छोटे दान करू शकतो, फक्त मनाला वाटायला हवे .

दान बरेच जण करतात. दान करताना आपले नाव व्हावे असेही बऱ्याच जणांना आवडते.पण गरजुला मदत होत असेल तर देणाऱ्याचे नाव होणे फार गैर नाही.

पण दानाची खरी उंची म्हणजे, जे दान नावाचा अहंकार बाजूला ठेवून स्वच्छ निर्मळ आणि आनंदी मनाने कुठल्याही परताव्याची अपेक्षा न करता केले दान होय. हे अतिशय अवघड असे काम आहे कारण त्या साठी मनाची अहंकार सोडण्याची तयारी हवी.

स्वामी विवेकानंद, लहान असताना आपल्या घरी दारावर येणाऱ्या प्रत्येक भिकाऱ्याला, साधूला घरातील सर्वात उत्तम वस्तू देऊन टाकत असत. म्हणून त्यांची आई भुवनेश्वरी देवी, घरातील चांगल्या वस्तू लपवून ठेवत असत. आणि मग घरात काहीच नाही सापडले तर स्वामी स्वतचं कमरेचे वस्त्र ही सोडून याचकाला देऊन घरात परत येत असत. ते नेहमी म्हणत देणाऱ्या पेक्षा



घेणारा हा देणाऱ्याच्या दातृत्वाची वाट उघडी करून देऊन देणाऱ्यांवर उपकार करत असतो.

विनोबा भावे यांच्या बालपणीचा एक प्रसंग आहे. त्यांची आई दारावर येणाऱ्या भिक्षेकरूला घरातील चांगले आणि ताजे अन्न देत असे. त्यामुळे कधी कधी विनोबांना शिळे अन्न खावे लागत असे. त्यामुळे ते एकदा आईला म्हणाले, आई, गीतेत सांगितल्या प्रमाणे ''देशे कालेच पात्रेच'' असं योग्य स्थान, काळ आणि पात्र पाहूनच व्यक्तीला दान द्यायला हवे. त्यावर त्यांची फार न शिकलेली आई म्हणाली, विन्या दारावर आलेला अतिथी देवच असतो.अतिथी देवो भव असच मी शिकले आहे.

तो व्यक्ती दानासाठी पात्र आहे की नाही? हे तू ठरव. खरच दानातली किती सुंदरता नाही का? यामुळे येथे प्रत्येकाचे विचार वेगवेगळे असू शकतात. खर तर मी माझ्या आयुष्यात तरी असं गरम गरम ताजे अन्न

सगुण- निर्गुण
गिरीश वसेकर( देशपांडे)
नांदेड सिटी,पुणे ९४२२६५९४००



भिकाऱ्याला कुणी देताना पाहीले नाही. पण शिळे उरलेले देऊन त्या बदल्यात अंगणातले गवत काढून घे, जुन्या काळातील घरे असतील तर दारा समोरील घाण, पाण्याने तुंबलेली नाली स्वच्छ करून घेणे आणि सोबत फार तर ०५ किंवा १० रू. देणारे, बघितले आहेत. मी बालपणी एकदा असेच आईला विचारले होते की त्या शेजारच्या काकु असे का करतात? तेंव्हा आई म्हणाली, की त्या म्हणतात, त्या भिकारी मुलाला ही कष्ट करून कमवायची सवय लागावी. म्हणून मी असे करते. यात उद्देश चांगला आहे पण समोरील भिकारी कृश आणि वृध्द असेल तर त्याच्या कडून शिळे पाते देऊन काम करून घेण्यात हे कोणते दातृत्व असेल? हा प्रश्न अनुत्तरित राहीला. दाता हा श्रेष्ठ आहे यात वाद नाही पण त्या भिकाऱ्याला परिस्थितीने भिकारी बनविलेले असते. मात्र चांगला धष्टपुष्ट मुलगा, तरुण भिक मागत असेल तर त्याला समजावून कष्ट करण्यास सांगणे, किंवा तशी मदत करणे मुळीच अयोग्य नाही .

संत ज्ञानेश्वर महाराजांनी एके ठिकाणी म्हंटले आहे, एखाद्याला दोर लावून पाण्यात पोहण्यास सोडले असता तो हात पाय मारत असतो पण मी मोठा पोहणारा आहे असे, तो सांगत नाही कारण त्याला माहीत असते मला कुणी तरी आधार देत आहे आणि म्हणूनच मी हे धाडस करू शकतोय. म्हणजे त्याला मुळीच अहंकार होत नाही. म्हणून दात्याला ही कधीच अहंकार होऊ नये. कारण ईश्वराच्या कृपेने, कष्टाला यशाची चव चाखता आलेली असते. दात्याचे आणखी उदाहरणे वाचण्यात आली ती म्हणजे बळी आणि कर्ण. या दोघांच्या बाबतीत. दान मागायला आलेला देवच दान मागतो आहे आणि हे केल्याने आपल्या जीवाला धोका आहे असे माहीत असूनही हे दान केले. त्यांचे एकच वाक्य होते, ते म्हणजे देव जर दान मागायला येत आहे तर आम्ही हे अर्पण करण्याची संधी का सोडू? काय म्हणावे या दात्यांना? दान आणि अर्पण यात खरा फरक असा आहे, की दान देणारा म्हणजे परिस्थितीने तो मोठा असतो मात्र  अर्पण केले असे जो म्हणतो तो देणारा जरी असला तरी घेणाऱ्या पेक्षा स्वतला कमी श्रेष्ठ समजत असतो. आणि कुठल्याही परताव्याची भावना, नावाच्या प्रसिद्धीची, किंवा कुणा कडून कौतुकाची थाप मिळण्याची अपेक्षा नसेल तर दान देण्याची ही अति श्रेष्ठ पातळी समजली जाते. आणि ही उंची गाठणे कठीण नक्कीच आहे पण अशक्य नाही . त्या मुळे असा दाता होण्याचा प्रयत्न मनाला आनंद आणि समाधान नक्कीच मिळवून देऊ शकेल.

# विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' कार्यक्रमात राज्यपालांचा युवकांशी संवाद

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई – भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची व मोलाची आहे. देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी युवकांनी विचार, कृती आणि नव कल्पनांच्या माध्यमातून पुढे येऊन भारतीय संस्कृतीचा वारसा जपत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

राष्ट्रीय युवा महोत्सव–विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२५–२६ राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्यातून निवड झालेल्या युवकांशी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सह सचिव एस. राममूर्ती, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, सहाय्यक संचालक मिलिंद दीक्षित, मुंबई विभागाच्या क्रीडा उपसंचालक सुवर्णा बारटक्के व राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेले विद्यार्थी उपस्थित होते.



राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभाग हा राज्यातील युवकांसाठी गौरवाची व प्रेरणादायी बाब असल्याचे गौरवोद्गार काढून दिल्ली येथील संवाद कार्यक्रमासाठी निवड झालेल्या युवकांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शुभेच्छा दिल्या.

राज्यपाल आचार्य देवव्रत युवकांशी संवाद साधताना म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाला नवे स्वरूप देण्यात आले असून देशातील सर्व राज्यातून विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यात आली. त्यातून निवड झालेल्या तीन हजार गुणवंत युवकांना थेट पंतप्रधानांशी संवाद साधण्याची संधी या महोत्सवाच्या माध्यमातून मिळणार आहे. मेहनत, परिश्रम व गुणवत्तेच्या बळावर  या स्पर्धेसाठी निवड झालेल्या युवकांचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी कौतुक केले. ते म्हणाले, या स्पर्धेसाठी झालेली युवकांची निवड ही विकसित राष्ट्र निर्माणातील त्यांच्या कष्टाच्या भूमिकेची पावती आहे.

भारत हा युवकांचा देश आहे. युवक देशाच्या विकासाला अधिक गती देण्याची भूमिका बजावू  शकतात, असा विश्वास व्यक्त करून राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, भारताचा विकास फक्त आर्थिक किंवा भौतिक उन्नतीपुरता मर्यादित नसून, संस्कृती, सभ्यता, परंपरा व नैतिक  मूल्यांचे जतन हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करतो. संपूर्ण विश्व हे एक कुटुंब मानणारी विचारधारा ही भारताची ओळख असून भारताने संत–महात्म्यांच्या माध्यमातून मानवतेचा संदेश जगभर पोहोचविला असल्याचेही राज्यपाल आचार्य देवव्रत यावेळी म्हणाले.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, देश सर्व क्षेत्रात प्रगती करीत असून स्टार्टअप्स, आत्मनिर्भर भारत अभियानामुळे भारत जागतिक पातळीवर वेगाने प्रगती करत आहे. भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला असून, तिसऱ्या क्रमांकाकडे वाटचाल करीत आहे. विकासाचा लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत आहे. युवकांमध्ये देशाला आत्मनिर्भर, समृद्ध आणि शक्तिशाली बनविण्याची क्षमता असल्याचे सांगून राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले युवकांनी अपयश आल्यास खचून न जाता परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक विचार करून विकसित राष्ट्र निर्माणात आपले योगदान द्यावे.



# सुंदर वास्तव, पालकांच्या हाती

**ज्योतिर्मय साहित्य**

पण करिअरच्या नावाखाली भरकटलेल्या पिढीला समजायला कोणीतरी हवंय. आणि खरे म्हणजे किती आजीआजोबा नातवंडांना स्वखुशीने सांभाळायला तयार असतात. महागाई वाढतच चालली आहे, लोकांना एक मुलाला शिकविण्यासाठी दोघांना नोकऱ्या करायला लागतात.  वास्तव हे आहे की, चांगल्या प्रतीचे? म्हणजे महागडे शिक्षण, मुलांच्या मागण्या, प्रवासखर्च, घरभाडे, महागाईचा भस्मासूर, कामवाल्या, बेबीसिटर यांच्या अवाच्या सवा पगाराच्या मागण्या. कोण कोणाला समजून घ्यायला तयार नाही. सासू सुनांतले अंतर कधी कमी होणार नाही, नणंद भावजयांचे कधी पटणार नाही, भावाभावांचे पटले तरी जावाजावांचे काय?



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

आता काही आजीआजोबा स्वतःहून सांगतात, मुलांना पाळणाघरात ठेवा, आम्हाला झेपत नाही, अशावेळी फक्त नवीन पिढीला दोष देता येत नाही, कारण पैशाचे सोंग आणता येत नाही.

मी अशी काही कुटुंब पाहिली आहेत, की सुनांनी नोकरी केली,  मुलांना भरपूर पैसे देऊन सांभाळायला बाई ठेवली घर कामाला मेड ठेवली तरी घरात असणारी मोठी माणसे मुलांना प्रेमाने खाऊ पिऊ घालतील याची काही खात्री नसते, उलट तुमची मुले आमचे काही ऐकत नाहीत असेही सांगणारी लोक असतात, एकंदरीत काळ बदलला आहे. प्रत्येकाला आपले वैयक्तिक स्वातंत्र्य हवे आहे.  गप्प बसणारी माणसे त्यात भरडली जातात, तर रोखठोक बोलणारी माणसे एकटी पडतात. एकंदरीत चारी बाजूने कोंडमारा आहे. याचे मूळ कशात आहे. तर अतिशिक्षण, अतिज्ञान, तांत्रिक साधने वाढली, मुलांची बुद्धिमत्ता वाढली, पैशाची किंमत वाढली, मुल्य कमी झाली, माणसे जास्तीत जास्त सुखसुविधा युक्त यंत्रणेत बसत चालली, हे हवे, जे नवे ते हवे, जुने ते केविलवाणे, काळ बदलला, माणसे बदलली असे म्हणण्यापेक्षा कोणाकडे दुसर्यांसाठी वेळ नाही. सामंजस्य नाही, समजावणीचे सल्ले, उपदेश ऐकायला कोणी रिकामे नाही, आमच्या काळात असे होते, नि तसे होते हे ऐकत बसायला कोणी थांबत नाही.

त्यात क्षणार्धात पूर्ण जगाची खबर मिळते, कुठेही दळण दळत बसायला कोणी तयार नसते. एकमेकांना समजावून घेतल्याशिवाय हे थांबणार नाही. एकत्र कुटुंबात आबालवृद्ध सर्व वयोगटातील माणसे रहात होती. पैसा कमी होता पण तरी पुरत होता. माणसांची स्वप्ने, महत्त्वाकांक्षा पोटापुरतीच मर्यादित होत्या.

या सर्वात बदल करायचा झाला तर घरातील वयोवृद्ध माणसे, आईवडिल यांनीच मुलांसाठी स्थळे वेळेतच शोधायला हवीत, उच्च शिक्षण, करिअर हे सगळे जरी छान वाटले तरी समाजव्यवस्था, वंश व्यवस्था सुरळित चालण्यासाठी पालकांनी मुलांच्या बाबतीत वेळेवर निर्णय घ्यायला हवा आहे.

उशिरा लग्न, उशिरा मुले यामुळे मानसिक, शारिरीक, आर्थिक सर्वच  संतुलन बिघडते, समतोल बिघडतो, विनाकारण खर्च, मनस्ताप ही होतो. आणि कुटुंबात तो मुलांना व आईवडिलांना जास्त होतो. सामंजस्याची गरज आहे. मुलामुलींना विश्वासात घेऊन संभाव्य धोके सांगितले तर परिस्थिती आटोक्यात येऊ शकते. संपूर्ण वेळ निघून जाण्या आधीच जनजागृती व्हायला हवी आहे.

घराण्याला वारसदार असायलाच हवा, माणूस हा समाजप्रिय आहे पण शेवटी कोणत्याही गोष्टींचा अतिरेक टाळायला हवा. यासाठी प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरातील विवाह योग्य वधूवरांना समाजाशी ओळख, सतत मेळावे भरवणे, विवाहासाठी नावनोंदणी करणे असे काही उपयुक्त काम करायला पाहिजे. प्रत्येक घराचा सर्व्हे केला तर लवकर विवाह जुळतील. पण नावनोंदणी हा प्रकार सुद्धा खर्चिकच आहे आणि मुलेमुली काही वस्तू नाही. तरीपण पालकांनी पुढाकार घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा व आपल्या मुलामुलींना योग्य साथीदार निवडून देण्यास मदत करावी. कुटुंब व्यवस्था म्हणजे काय, संसार थाटला म्हणजे काय हे वेळेवर पटवून देण्याचा जबाबदारी पालकांची आहे.

पालकांनी या बाबतीत स्वतःहून लक्ष द्यावे. शोधमोहिमेला सुरुवात करावी.  नुसता विचार नव्हे, वेळेवर योग्य कृती करण्याची ही बाब आहे.  तसेच फिल्मी वागणे सोडून सुसंस्कारी पद्धतीने विवाहविधी करावेत, विनाकारण होणारे खर्च टाळून तो पैसा आपल्या मुलांच्या संसारासाठी उपयोगात आणावा.  शेवटी मुले सुखी तर आईवडिल सुखी.  विचार करुन योग्य कृतीला सुरुवात करायची ही वेळ आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559